शिवाजी विद्यापीठ
तक्रार निवारण समिती
कोल्हापूर.

## तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं २७/२०१८**

प्रा. बोंबले उत्तम लक्ष्मणराव } तक्रारदार

विरूध्द

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर } वि. प.

### तक्रारीचे स्वरूप :

तक्रारदार प्रा. बोंबले उत्तम लक्ष्मणराव यांची नियुक्ती दि. ०९/०३/२००९ रोजी एम.टेक इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी सहयोगी प्राध्यापक पदी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झाली आहे. तक्रारदार यांनी नोव्हेंबर, २०१० साली पीएच.डी. पदवी धारण केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग तरतूद क्र. 8.1.4 (I&ii) Page No. 47 नुसार पीएच.डी. धारण केल्यानंतर देय असणाऱ्या तीन वेतनवाढी किंवा इतर अतिरिक्त कोणतीही वेतनवाढ विद्यापीठाने दिलेली नाही, सदरची वेतनवाढ व २०१० पासून वेतनवाढीचा फरक मिळावा याकरिता दि. २०/०९/२०१६ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीच्या पृष्ठयार्थ दि. १४/१२/२०१५ रोजी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ यांना युजीसी नियमानुसार पीएच.डी. धारण केली याबाबत डिसेंबर २०१० पासून प्रोत्साहनात्मक तीन वेतनवाढीचा लाभ व त्याबाबतचा फरक देण्याची लेखी विनंती केली. दि. १३/०८/२००८ रोजीचे तक्रारदार यांना दिलेले नियुक्ती पत्र सादर केले आहे. सोबत अन्य कागदपत्रांबरोबर युजीसी नियमाची

प्रत जोडली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तरतूद क्र. 8.1.4 (I & ii) Page No. 47 नुसार आपणास वेतनवाढीचा लाभ दिला जावा अशी लेखी विनंती त्यांनी विद्यापीठ कार्यालयाकडे केली होती. तथापी विद्यापीठ कार्यालयाने ती नाकारली आहे.

**विद्यापीठ कार्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारदार यांची विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील एम.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स ॲंड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी सहयोगी प्राध्यापक पदाची वेतनश्रेणीत दि. ०९/०३/२००९ रोजी नियुक्ती केली आहे. तक्रारदार यांनी प्राध्यापक पदाकरिता अर्ज केला होता. मुलाखतीवेळेस तक्रारदार पीएच.डी. पदवी धारण करित नव्हते. दि. १३/०८/२००८ रोजी त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले त्या पत्रामध्ये खालील बाब नमूद होती.

'I am directed to inform you that the Hon'ble Vice Chancellor is pleased to appoint you as a Associate Professor against post of Professor in M.Tech in Electronics and Technology in the Department of Technology, Shivaji University, Kolhapur with immediate effect.

Your appointment is on probation for a period of two years.

Your pay will be protected on producing of last pay certificate from the present employer and subject to the approval of Management Council of this University. When you will acquire the degree of Ph.D. you will be appointed as a Professor on the starting basic pay of Rs. 20,000/- p.m. in the scale of Professor.'

तक्रारदार हे यापूर्वी कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापक पदाची वेतनश्रेणीतील मूळ वेतन रू. १८,२००/— हे

व्यवस्थापन परिषदेच्या दि. २९ मे, २००९ च्या बैठकीतील विषय क्र. ०३ च्या ठरावान्वये संरक्षित केली आहे.

तक्रारदार यांचे नियुक्ती वेळेस तक्रारदार यांनी सेवेत आल्यानंतर दि. २०/११/२०१० रोजी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी तीन प्रोत्साहनात्मक वेतनवाढीचा लाभ मिळावा यासाठी अर्ज केला आहे. शासन निर्णय दि. २०/०८/२०१० मध्ये तीन प्रोत्साहनात्मक वेतनवाढीचा लाभ देण्याबाबतची तरतूद आहे. तथापी, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि. ०४/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शिक्षकांच्या अर्हता, वेतनश्रेणी, पदोन्नती इत्यादीबाबत दि. ०६/०१/२०१६ रोजीच्या राजपत्राद्वारे पान क्र. २५(C) RELATED TO INCENTIVE/NON COMPOUNDED ADVANCE INCREMENTS मधील मुद्दा क्र. २५ मध्ये खालील प्रमाणे स्पष्टता करण्यात आली आहे.

| Sr. No. | Issue | Clarification |
|---|---|---|
| 25 | Admissibility for non-compounded advance increments/Non-compounded increments for higher qualifications (Degree and Diploma Institutions) as a incentive for Ph.D /M. Tech and other higher qualifications. | i) There shall be no increments on completion of PDF/D.Sc fellowship programs.<br>ii)There shall be no advance increments for acquiring M.Tech/M.phil or Ph.D degree to those who are already working as a regular faculty with lower qualifications are/were essential for the post<br>iii) Non – compounded advance increments (Three/Two/One) on acquiring Ph.D/M.Phil/M.Tech and other equivalent qualifications, while in service, wherever applicable in AICTE Regulation, 2010 shall be granted in PB-3 (Rs.15600-39100) only. The advance increments for those who acquired Ph.D/M.Phil/M.Tech and other equivalent qualifications, while in service, wherever, while in service are of allowed in the PB-4(Rs.37400-67000)<br>iv) Associate professor who has completed Ph.D and other higher qualifications while in service/or directly recruited will not be given any advance increment and their basic pay will be fixed as per rule.<br>v) No advance increments are admissible to those who acquired M.E/M.Tech qualification prior to 01-01-2006, while in service. |

सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक पदाला आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता पीएच.डी पदवी आहे. ही बाब विचारार्थ घेता डॉ. बोंबले यांची विनंती अमान्य करण्यात आली. तसे त्यांना कार्यालयीन पत्र क्रमांक आस्थापना/पीजी/८१३ दि. ०६/०५/२०१६ अन्वये कळविले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

इलेक्ट्रानिक्स टेक्नॉलॉजी विषयाचे प्राध्यापक पदाकरिता जाहिरात क्र. ०३/२००८, दि. ३०/०४/२००८ ची जाहिरात दिसून येते. तक्रारदार यांनी या पदाकरिता तक्रारअर्ज केल्याचे दिसून येते. तक्रारदार यांची नियुक्ती करण्यात आलेल्या व कार्यरत असलेल्या पदासाठी पीएच.डी. ही आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे. तक्रारदार यांच्या नियुक्तीवेळेस ते शैक्षणिक अर्हता पूर्ण करित नव्हते. नियुक्ती आदेशामध्ये तक्रारदार यांनी पीएच.डी. पूर्ण करणेच्या अटीस अधीन राहून प्राध्यापक पदी नियुक्ती देण्यात येईल असे नमूद केले आहे, परंतु त्यांचा प्राध्यापक पदी देण्यात येत असलेली वेतनश्रेणी संरक्षित करून सहयोगी प्राध्यापक पदी नियुक्ती देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या संबंधित विभागाने समितीसमोर मांडलेल्या म्हणण्यामध्ये तक्रारदार यांना नियुक्तीपासून प्राध्यापक पदाचे वेतन देण्यात येत असल्याचे सांगितले. सबब आवश्यक असणाऱ्या पदाची अर्हता पूर्ण केली असलेने प्रोत्साहनात्मक वेतनवाढ देणे संयुक्तीक नाही. दि. २०/०८/२०१० च्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि. ०४/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शिक्षकांच्या अर्हता,वेतनश्रेणी,पदोन्नती इत्यादीबाबत दि. ०६/०१/२०१६ रोजीच्या राजपत्राद्वारे पान क्र. २५ वरील (सी) RELATED TO INCENTIVE/NON COMPOUNDED ADVANCE INCREMENTS यांच्या मधील

मुद्दा क्र. २५ ii)There shall be no advance increments for acquiring M.Tech/M.phil or **Ph.D degree** to those who are already working as a regular faculty with lower qualifications are/were essential for the post

मधील तरतुदी विचारात घेता तक्रारदार यांची पीएच.डी. च्या प्रोत्साहनात्मक वेतनवाढी नियमानूसार देय नाहीत.

## आदेश

उपरोक्त कारणास्तव तक्रारदाराचा तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत तक्रारदार, संबधित विभाग यांना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : १ ऑक्टोबर २०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

1-10-19

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी)

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)